पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पुणे

# । मराठी विभाग ।

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल

## १ ते १५ जानेवारी २०१९

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त महाविद्यालयात हस्ताक्षर स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, कादंबरीतील निवडक मजकुराचे अभिवाचन, शुद्धलेखन स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व एपक्रमांना विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. त्या उपक्रमांचा अहवाल पुढील प्रमाणे -

### हस्ताक्षर स्पर्धा

महाविद्यालयात हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेसाठी एक उतारा देण्यात आला होता. या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले.

दिनांक : १ जानेवारी २०१९ । स्थळ : मराठी विभाग

प्रथम क्रमांक : **पूनम अर्जुन शिंदे** (प्रथम वर्ष वाणिज्य, क)
द्वितीय क्रमांक : **अंकिता परशुराम हगवणे** (प्रथम वर्ष वाणिज्य, अ)
तृतीय क्रमांक : **रुस्तुम उफाडे** (प्रथम वर्ष कला)

### शुद्धलेखन स्पर्धा

महाविद्यालयात शुद्धलेखन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत ८५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.
या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले.

दिनांक : २ जानेवारी २०१९ । स्थळ : खोली क्रमांक २ व ३

प्रथम क्रमांक : **रोहिनी शेंडे** (द्वितीय वर्ष कला)
द्वितीय क्रमांक : **दिनेश जोरी** (तृतीय वर्ष कला)
तृतीय क्रमांक : **किशोर जाधव** (द्वितीय वर्ष कला)

### कविता वाचन

विद्यार्थ्यांना पद्यशैलीच्या सादरीकरणाचे कौशल्य आत्मसात व्हावे, या उद्देशाने काव्यवाचनाचा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी त्यांना आवडणाऱ्या विंदा करंदीकर, नामदेव ढसाळ, भालचंद्र नेमाडे, इंद्रजित भालेराव, शांता शेळके आदी मान्यवर कवींच्या कवितांचे उत्तम सादरीकरण केले.

सूत्रसंचालन कल्याणी पडवळ हीने केले, तर आभार किशोर जाधव याने मानले.

दिनांक : ९ जानेवारी २०१९ । स्थळ : मराठी विभाग

### कादंबरी अभिवाचन

विद्यार्थ्यांना गद्यशैली सादरीकरणाचे कौशल्य आत्मसात व्हावे, या उद्देशाने काव्यवाचनाचा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात ६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी बनगरवाडी (व्यंकटेश माडगूळकर), हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ (भालचंद्र नेमाडे), ब, बळीचा (राजन गवस) मान्यवर कादंबरीकारांच्या कादंबरीतील निवडक उताऱ्यांचे साभिनय सादरीकरण केले.

सूत्रसंचालन दिनेश जोरी याने केले, तर आभार नेहा म्हात्रे हीने मानले.

दिनांक : १० जानेवारी २०१९ । स्थळ : मराठी विभाग

☐ मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मराठी विभागातील प्राध्यापकांनी विविध उपक्रमांत सहभाग नोंदवला :

१. डॉ. विजय बालघरे : दि. ४ व ५ जानेवारी २०१९ रोजी शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर, ता. भोर, जि. पुणे यांनी **बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता** या विषयावर आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात डॉ. विजय बालघरे यांना एका सत्राचे अध्यक्ष म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. डॉ. विजय बालघरे यांनी राजन गवस यांच्या कवितेमधील पर्यावरणीय संदर्भ या विषयावर शोधनिबंध सादर केला.

२. प्रा. सुशील धसकटे : दि. ४ व ५ जानेवारी २०१९ रोजी शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर, ता. भोर, जि. पुणे यांनी **बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कविता** या विषयावर आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. सुशील धसकटे यांनी **अजय कांडर यांची कविता आणि बदलते सांस्कृतिक पर्यावरण** या विषयावर शोधनिबंध सादर केला.

३. प्रा. सुशील धसकटे : दि. ११ जानेवारी २०१९ रोजी आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे यांनी आयोजित केलेल्या **लेखक आपल्या भेटीला** या कार्यक्रमाला प्रा. सुशील धसकटे यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. राहुल पुंगलिया यांनी सुशील धसकटे यांच्या **जोहार** या कादंबरीचा अभ्यासपूर्ण परिचय उपस्थित विद्यार्थ्यांना करून दिला. त्यानंतर सुशील धसकटे यांनी कादंबरी लेखनप्रक्रिया, तसेच त्याविषयीचे आपले अनुभव कथन केले.

४. प्रा. सुशील धसकटे : महाराष्ट्र शासन भाषा विभाग आणि भाषा-वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित **मराठी भाषा आणि ग्रंथप्रकाशन** या संवादसभेला प्रा. सुशील धसकटे यांना आमंत्रित करण्यात आले होते. या संवादसभेत प्रा. धसकटे यांनी **आजची मराठी भाषा आणि मराठी ग्रंथव्यवहार** या विषयावर मांडणी केली. हा कार्यक्रम नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या *भाषा-वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलात* संपन्न झाला. (दि. १४ व १५ जानेवारी २०१९)

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यशस्वीपणे साजरा करण्यासाठी मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांनी सर्वतोपरी प्रयत्न केले.

- डॉ. विजय बालघरे
मराठी विभागप्रमुख